महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण या योजनेंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत. (सन २०२२-२३ लेखाशिर्ष मागणी क्र. झेडए-२ (२२३० ए३३४)

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**

**शासन ज्ञापन क्रमांक कौविउ-२०२२/प्र.क्र.१०६/कौशल्य-१**

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २५ जुलै, २०२२

वाचा : १. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८/दिनांक १५ मे, २००९.

२. शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३/दिनांक ०४ एप्रिल, २०२२

३. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई यांचे दिनांक २० जून,२०२२ रोजीचे पत्र.

**ज्ञापन :**

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण या योजनेंतर्गत, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये, लेखाशिर्ष मागणी क्र. झेडए-२ (२२३० ए३३४) अंतर्गत निधी वितरीत करण्याची विनंती संदर्भाधीन क्र. ३ येथील पत्रान्वये शासनास केली आहे.

२. उपरोक्त विनंतीस अनुसरुन, महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण या योजनेंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये, रु.८.१९ कोटी (अक्षरी रुपये आठ कोटी एकोणीस लाख फक्त) इतका निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदरहू खर्च मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) (१३) महाराष्ट्र नाविण्यपूर्ण स्टार्टअप धोरण लेखाशिर्ष २२३० ए३४३ ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२३ मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु. ३९.०० कोटी (एकोणचाळीस कोटी फक्त) इतक्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

४. याकरिता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांना नियंत्रण अधिकारी, सहायक संचालक, लेखा यांना “आहरण व संवितरण अधिकारी” तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांना “नोडल एजन्सी” म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. सदर निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांचेकडे वर्ग करुन याबाबतचे लेखे स्वतंत्र व अद्ययावत ठेवावेत. उपरोक्त निधी ज्या कारणास्तव उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्याच कारणास्तव खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांची राहील. याकरिता स्वतंत्र खाते उघडण्यात यावे. तसेच प्रत्यक्ष खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) विहित कालमर्यादेत सादर करण्याची दक्षता घ्यावी. उक्त निधी खर्च करताना वित्त व नियोजन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/अटी व शर्तीचे पालन करावे.

६. सदरहू ज्ञापन वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,दिनांक १५ मे २००९ अधिकारांस प्रशासनिक विभागास दिलेल्या अधिकारांस अनुसरुन तसेच वित्त विभाग परिपत्रक ०४. एप्रिल, २०२२ मधील तरतुदींस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२२०७२५१३०८११७८०३ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUVARNA S KHARAT

Digitally signed by SUVARNA S KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=cdf8435b14113ef43d22f63f448b2db4109f1aa98eda5f3b78841f6bc40a437b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=35F57024DD03B25B43EA1F6F39E191F897508AEF3C68A8BD9209A39DD656B14C, cn=SUVARNA S KHARAT
Date: 2022.07.25 13:13:16 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे.
५. अपर कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई,
६. कार्यासन अधिकारी, (प्रशा-३), कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती (कौशल्य -१ ), कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.